




लोकमत



मेळाव्याप्रसंगी डॉ. काकडे, डॉ. कपूर, डॉ. वातिले आदी.

# डॉ. खत्री महाविद्यालयात रोजगारावर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

चंद्रपूर : स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे रोजगाराच्या संधी या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे, प्रमुख अतिथी म्हणून ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूरचे सचिव डॉ. एस. बी. कपूर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ या महाविद्यालयाच्या संस्थेचे सचिव डॉ. शीतल वातिले, पुणे येथील एच. आर. अँड डेव्हलपमेंटचे समन्वयक प्रमोद साबणे आदींची उपस्थिती होती.

मार्गदर्शक डॉ. शीतल वातिले म्हणाले, विद्यार्थ्यांनी मनापासून, निष्ठेने अभ्यास केला आणि ध्येय समोर ठेवून प्रामाणिक प्रयत्न केला तर कोणताही विद्यार्थी रोजगारापासून वंचित राहू शकणार नाही. आत्मविश्वासाने आणि परिश्रमाने प्रयत्न करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

प्रमोद साबणे, डॉ. एस. बी. कपूर, प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संचालन आयक्यूएसी समन्वयक डॉ. एन. आर. दहेगावकर, आभार जॉब प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. टी. डी. कोसे यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

Hello Chandrapur